# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २३०-२३ दिनांक :- २४/०७/२०२३

## वसई परिसरात ३ ठिकाणी ए.टी.एम मशिन तोडण्याचा प्रयत्न करणा-या आरोपीतांस अटक करुन ३ गुन्हांची उकल- गुन्हे शाखा कक्ष, २ वसई यांची कामगीरी.

माणिकपुर पोलिस ठाणे् कार्यक्षेत्रात स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेमध्ये काम करणाऱ्या फिर्यादी नामे सौ. प्रगती अनिकेत सावंत, व्यवसाय-ब्रांच मॅनेजर, रा. फ्लॅट नं ९०४, टॉवर नं.-१८, श्री शाश्वत कॉम्पलेक्स, प्लेजंट पार्क जवळ, मिरारोड पुर्व, ठाणे हे काम करीत असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, बाभोळा नाका ब्रांच, रिचमंड टॉवर, शॉप नं. ३, खाऊ गल्लीच्या पाठीमागे, वसई प., ता.वसई, जि पालघर येथील एटीएम मशीन मधील कॅश चोरी करण्याच्या उद्देशाने अनोळखी इसमांनी संगनमताने ए.टी.एम. मध्ये प्रवेश करुन रॉडच्या सहाय्याने ए.टी.एम. मशिनचा चेस्ट कॅबीनेटचा दरवाजा व कॅश डिस्पेंसर तोडुन ए.टी.एम. मशीनमधील कॅश चोरी करण्याचा प्रयत्न केल्याबाबत फिर्याद दिल्याने माणिकपुर पोलीस ठाणेत २०/०७/२०२३ रोजी १५.१४ वा. गुन्हा रजि नं I २७२/२०२३ भा.द.वि.सं कलम ३८०, ५११, ४२७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये ए.टी.एम.मशिन तोडुन त्यातील रक्कम चोरीचे प्रकार घडत असल्याने सदरच्या चो-यांवर आळा घालणेबाबत वरीष्ठांनी आदेशित केले होते. त्या-अनुषंगाने घडलेल्या गुन्हयांचे घटनास्थळी भेट देवून घटनास्थळी भेट देवुन तांत्रीक तपास करुन गुन्हा उघडकीस आणण्याचा गुन्हे शाखा कक्ष, २ वसई हे कसोशीने प्रयत्न करीत होते. त्याप्रमाणे माणिकपुर पोलीस ठाणेत दाखल असलेल्या वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने घडलेल्या गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून सदर घटनास्थळ आणि येण्या-जाण्याचे मार्गावरील सी.सी.टी.व्ही. फुटेजचे परीक्षण करुन लाल रंगाची Fiat Linea एमएच/१२/एफएफ या अपुर्ण नंबरचे वाहन हे गुन्हयातील अज्ञात चोरटयांनी गुन्हा करणेकरीता वापरल्याचे निष्पन्न केले. सदर कॅमेरांचे फुटेजमधील लाल रंगाची Fiat Linea एमएच/१२/एफएफ या वाहनाचा मार्ग काढला असता सदरची कार Fiat Linea एमएच/१२/एफएफ/५०६१ ही आचोळे डोंगरी परीसरात उभे असल्याचे दिसुन आले. सदर कारचे आजुबाजुस सापळा रचुन थांबले असताना ६ इसम हे सदरची कार चालू करुन त्यात बसत असताना सदर इसमांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा विधीसंघर्षग्रस्त बालक याचे सहित केल्याचे निष्पन्न झाले आहे.

**अटक करण्यात आलेल्या आरोपीतांचे नाव व पत्ते :-**

१) रोहीत उर्फ डी रसल डिसोझा, रा. पडखळपाडा, एव्हरशाईन डोंगरी, नालासोपारा पुर्व

२) प्रभु उर्फ बदक विनोदकुमार चौहाण, रा. आचोळे डोंगरी, भोलेनाथ मंदिर समोर, नालासोपारा पुर्व

३) साहील बुधराम टाक, रा. रुम नं -३, जय साई चाळ, नालासोपारा पुर्व,

४) सोनु नयनसिंग परीयार, रा. जिवदानी अपार्टमेंट रुम नं ३०७, आचोळे रोड, वसई पुर्व

५) कौशिक विजय यादव,रा. आचोळे डोंगरी, भोलेनाथ मंदिर समोर, नालासोपारा पुर्व

सदर आरोपीत यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

## -: उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजी नं.,कायदा,कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे | २७२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ५११, ४२७, ३४ प्रमाणे (मुळ गुन्हा) |
| २. | वालीव पोलीस ठाणे | I ६२५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ४५७, ५११, ३४ प्रमाणे |
| ३. | वालीव पोलीस ठाणे | I ६२६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ४५७, ५११, ३४ प्रमाणे |

नमुद आरोपीत यांना अटक करुन त्यांचे ताब्यातुन गुन्हे करणेकरीता वापरलेली Fiat Linea Emotion कंपनीची चार चाकी गाडी, VIVO 1908 कंपनीचा मोबाईल आणि कटावणी असा एकुण ५,०५,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. यातील अटक आरोपी नं. १ रोहीत उर्फ डी रसल डिसोझा हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर तुळींज व विरार पोलिस ठाणेत दिवसा व रात्रीच्या घरुफोडीचे ६ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगीरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा - २ वसई युनीटचे पो.नि.श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, माणिकपूर पोलीस ठाण्याचे स.पो.नि.सचिन सानप, पो.हवा. धनंजय चौधरी, सायबर शाखेचे स.फौ.संतोष चव्हाण, विरार वाहतुक शाखा परीमंडळ -०३ नेम.चे पो.अं. रमजान नसीर खान, म.सु.ब.रामेश्वर केकान, अविनाश चौधरी यांनी केली आहे.




----000----